# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक १४/०८/२०१७**

**सायं ४.३० वा.**

| विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|
| १)मा. सर्वसाधारण सभा दि. १४/०७/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १४/०७/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहेत.<br>अनुमोदक :- (किशोर ग. पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २) प्रश्नोत्तरे | |
| ३) शासकिय पत्रव्यवहार माहितीस्तव | ठराव :- |
| ४) श्री. मंगेश विलास तुबंडे यांना त्यांचे वडील कै.विलास विष्णु तुबंडे, सफाई | निर्णय/ठरावः- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - जी, वालीव येथील कर्मचारी कै. विलास विष्णू तुंबडे ,सफाई कामगार हे दिनांक २/०५/२०१५ रोजी निधन झाले असुन त्यांचा वारस मुलगा कु.मंगेश विलास तुंबडे हे सामाजिक न्याय व विशेष |

| अ.क्र | शासकिय कार्यालयाचे नाव | पत्र दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १. | नगरविकास विभाग | १५/०७/२०१७ | राज्यातील बृहन्मुंबई व इतर महानगरपालिकातील सदस्यांचे मानधन वाढविण्याबाबत. |
| २. | तहसिलदार कार्यालय वसई | ३१/०७/२०१७ | जिल्हा ग्राहक सरक्षंण परिषदेवर अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती बाबत. |
| ३. | महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचलनालय | २५/०७/२०१७ | अमृत मिशन अंतर्गत आयोजित क्षमता बांधणी प्राशिक्षणास मा.लोकप्रतिनिधी ऑल इडीया इंस्टीटयुट अंधेरी मुंबई येथे उपस्थित राहणे बाबत (प्रशिक्षण) |

| | |
|---|---|
| **कामगार यांच्या जागी वारसाहक्काने लाड कमिटीच्या शिफारशीनुसार नोकरी मिळणेबाबत.** | सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक, दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय, दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज चोरघे) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| **५. श्री सुरेश केशव बोस, सफाईकामगार, प्रभाग समिती ई नालासोपारा पश्चिम वाघोली, यांनी गैरवर्तणूक केल्याप्रकरणी सेवेतुन निलंबीत केल्याबाबत.** | **ठराव/निर्णय :-** श्री. सुरेश केशव बोस, सफाई कामगार, प्रभाग समिती - ई, नालासोपारा (प.), अंतर्गत वाघोली विभागीय कार्यालय यांचेप्रकरणी प्रशासनाने निदर्शनास आणलेल्या बाबींचे अवलोकन करण्यांत आले. श्री. सुरेश केशव बोस यांनी स्वत:च्या स्वार्थासाठी विविध संघटनांचा वापर करुन महानगरपालिकेवर मोर्चाचे आयोजन करुन महानगरपालिकेला वेठीस धरण्याचे काम केले आहे. सदर बाब गंभीर असून, कार्यालयीन शिस्तीस धरुन नाही तसेच त्यामुळे महानगरपालिकेची प्रतिमा मलीन झाली असून, त्यांची ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ चा भंग करणारी आहे. त्याअनुषंगाने प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६ चे पोट कलम (२) खंड (फ) अन्वये त्यांना सेवतून निलंबित केले आहे. प्रशासनाने या प्रकरणी आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी, असा निर्देश ही महासभा देत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज चोरघे) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| **६) श्री विष्णु गोविंद झिबल, नळकारागीर, प्रभाग समिती ई नालासोपारा पश्चिम वाघोली, यांनी गैरवर्तणूक केल्याप्रकरणी सेवेतुन निलंबीत केल्याबाबत.** | **ठराव/निर्णय :-** श्री. विष्णू गोविंद झिंबल, नळ कारागीर, प्रभाग समिती - ई, नालासोपारा (प.) वाघोली यांचेप्रकरणी प्रशासनाने निदर्शनास आणलेल्या बाबींचे अवलोकन करण्यांत आले. श्री. विष्णू गोविंद झिंबल हे बदलीच्या ठिकाणी हजर झालेले नाही. तसेच त्यांनी वरिष्ठांचे आदेशाचा अवमान केला असून, स्वत:च्या स्वार्थासाठी विविध संघटनांचा वापर करुन महानगरपालिकेवर मोर्चाचे आयोजन करुन महानगरपालिकेला वेठीस धरण्याचे काम केले आहे. सदर बाब गंभीर असून, कार्यालयीन शिस्तीस धरुन नाही तसेच त्यामुळे महानगरपालिकेची प्रतिमा मलीन झाली असून, त्यांची ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ चा भंग करणारी आहे. त्याअनुषंगाने प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६ चे पोट कलम (२) खंड (फ) अन्वये त्यांना सेवतून निलंबित केले आहे. प्रशासनाने या प्रकरणी आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी, असा निर्देश ही महासभा देत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज चोरघे) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | |
|---|---|
| **७) वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ मधील अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्गातील अनुशेष सरळ सेवेने भरणेसाठी मे.महाऑनलाईन लिमीटेड या शासनमान्य एजन्सीची नेमणूक करणेकामी आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ मधील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील अनुशेष सरळ सेवेने भरणेसाठी मे. महाऑनलाईन लिमीटेड या शासनमान्य एजन्सीची नेमणूक करण्यास तसेच त्यासाठी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत प्रशासनाचा प्रस्ताव पाहण्यात आला. मे. महाऑनलाईन लिमीटेड यांचेकडून सरळसेवा भरतीची प्रक्रिया पार पाडली जाते. मे. महाऑनलाईन लिमीटेड हा महाराष्ट्र शासन व टाटा कंसल्टन्सी सर्व्हिसेस यांचा संयुक्त उपक्रम आहे. मे. महाऑनलाईन लिमीटेड कंपनी ही महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत परीक्षा केंद्र ठेवणार आहे. तथापी उपरोक्त सरळसेवा भरतीसाठी सर्व परीक्षा केंद्र ही पालघर जिल्ह्यातच ठेवावीत, अशी शिफारस आजची ही सभा करीत आहे. त्यासाठी मे. महाऑनलाईन लिमीटेड कंपनीच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन सर्व परीक्षा केंद्र पालघर जिल्ह्यातच ठेवली जातील असे पहावे. शासनाने खुल्या प्रवर्गासाठी रु. ३००/- व राखीव प्रवर्गासाठी रु. १५०/- इतके निश्चित केलेले परीक्षा शुल्क हे अल्प आहे. ऑनलाईन सरळसेवा भरती प्रक्रियेकामी येणारा खर्च जास्त आहे. राज्यातील काही महानगरपालिकांनी सरळसेवा भरतीसाठी खुल्या प्रवर्गासाठी रु. ८००/- व राखीव प्रवर्गासाठी रु. ४००/- इतके परीक्षा शुल्क निश्चित केले होते, असे समजते. तरी वसई-विरार शहर महानगरपालिकेनेदेखील सरळसेवा भरतीसाठी खुल्या प्रवर्गासाठी रु. ८००/- व राखीव प्रवर्गासाठी रु. ४००/- इतके परीक्षा शुल्क आकारावे, असा निर्णय ही महासभा घेत आहे. तरी महानगरपालिकेने प्रस्तावित केलेल्या महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ मधील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील अनुशेष सरळसेवेने भरणेसाठी मे. महाऑनलाईन लिमीटेड या शासनमान्य एजन्सीची नेमणूक करण्यास तसेच त्यासाठी येणाऱ्या खर्चास आजची ही सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज ठाकूर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| **८) राज्यातील बृहमुंबई व इतर महानगरपालिकांतील सदस्यांचे मानधन वाढविणे. सुधारीत दराने मानधन अदा करणेबाबत.** | **ठराव :-** सादर केलेल्या अहवालावर चर्चा करण्यांत आली. शासन निर्णय क्रंमाक संकिर्ण २०१५/प्र.क्र.-१२८/नवि-२० दिनांक १५ जुलै २०१७ नुसार वसई विरार शहर महानगरपालिका सदस्यांना माहे ऑगस्ट २०१७ पासून सुधारीत दराने म्हणजेच रुपये १०,०००/- प्रती महा मानधन अदा करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी प्रदार करीत आहे.<br>**अनुमोदक :- (शुभांगी गायकवाड) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| **९) मा.अतिरिक्त आयुक्त यांना वाहन भत्ता मंजुर करणेबाबत.** | **प्रस्ताव / निर्णय** :- सदर प्रकरणी सभागृहात साधक बाधक चर्चा केली असता मा. अति.आयुक्त यांना पूर्वलक्षी प्रभावाने रु. ६५,०००/- (अक्षरी रुपये पासष्ट हजार मात्र) वाहन प्रतिपूर्ती भत्ता देणेस हि सभा वित्तीय व प्रशासकिय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (सुदेश चौधरी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | |
|---|---|
| <u>१०) वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीचे कार्यक्षेत्र ठरविणे बाबत.</u> | **ठराव :-** वरील विषयाबाबत साधकबाधक चर्चा करण्यांत आली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (२) व ३० (६) चा विचार करुन, आजची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेत नव्याने स्थापित झालेल्या वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समितीस<br>१. महानगरपालिकेची बाहय औषधालये, रुग्णालये (संसर्गिक रोगाचे रुगणालय धरुन) प्रसुतीगृहे वैघकीय आणि शुश्रुषात्मक सहाय्य आणि वैद्यकीय संस्थाना मदत करण्याऱ्या संबंधिचे सर्व प्रश्न<br>२. आरोग्य विभाग :- रस्ते सफाई कचरा वाहतुक धरुन तत्संबधी इतर सर्व प्रश्न<br>३. फेरीवाला धोरण अंमलबजावणीबाबतचे प्रश्न<br>४. रस्त्यावरील दगड माती रॅबीट उचलणे<br>५. घनकचरा व्यवस्थापनाबाबतचे सर्व प्रश्न<br>इत्यादी प्रस्तावित केलेप्रमाणे कामकाजाचे क्षेत्र, अधिकार आणि कर्तव्य प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- (कांता पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| <u>११) महानगरपालिका मुख्यालयातील दैनंदिन सुरक्षा, प्रभाग समिती कार्यालय, तुळींज व वसई येथील रुग्णालय, स्विमिंगपुल इ. ठिकाणांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा यांचे कडून सुरक्षा रक्षक घेणेबाबत.</u> | <u>**ठराव/निर्णय :-**</u> प्रशासनाने उपरोक्त सादर केलेल्या प्रस्तावावर विचारविनिमय करुन आजची ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :- महाराष्ट्र राज्य सूरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडील सूरक्षा रक्षकाचा सध्याचा मासिक दर सर्वसाधारणपणे रु. २०,०००/- (अधिक १८ % जी.एस.टी.) इतका आहे. तर सूरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा यांचेकडील सूरक्षा रक्षकाचा दर रु. १८,२५०/- (अधिक १८ % जी.एस.टी.) इतका आहे. महाराष्ट्र राज्य सूरक्षा महामंडळाकडील सूरक्षा रक्षकांची सेवा उत्तम असून सेवेचा दर्जा चांगला आहे. सदर बाब विचारात घेता प्रस्तावित ६० सूरक्षा रक्षक हे सूरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा, यांचेऐवजी महाराष्ट्र राज्य सूरक्षा महामंडळ या राज्य शासनाच्या वैधानिक महामंडळाकडून घ्यावेत, अशी शिफारस ही सभा करीत आहे. यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य सूरक्षा महामंडळाकडून सूरक्षा रक्षक आल्यानंतर Sainik Intelligence and security Pvt. Ltd. यांचेकडील सूरक्षा रक्षक कमी करण्यांत यावेत. भविष्यात अतिरिक्त सूरक्षा रक्षक घ्यावयाचे असल्यास ते महाराष्ट्र राज्य सूरक्षा महामंडळ याचेकडून घेण्यास व त्याची मासिक देयके अदा करण्यास देखील आजची ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (कांता पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

**१२).सन २०१७/१८, २०१८/१९, व २०१९/२० या वर्षासाठी क्लीन अप मार्शल (अभिकर्ता) नेमणेकामी जाहीर निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्तावाचा निर्णय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६६ (अ) पोटकलम २ अन्वये खालील विषयांवर स्वच्छता अबाधित राखणेकामी प्रशासकीय शुल्क वसुल करणेसाठी तीन वर्षाचे कालावधी करीता अभिकर्ता नेमून कार्यवाही करणेबाबतचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा करुन खालीलप्रमाणे ठरले. वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये साफसफाई मोहिमेमध्ये बराच सकारात्मक प्रतिलाभ मिळाला आहे. सद्या महापालिका स्वच्छ भारत मिशन व स्वच्छ महाराष्ट्र मिशन हे उपक्रम राबविण्यात येत आहे. तसेच सार्वजनिक स्वच्छता उपद्रवावर नियंत्रण करण्यात येत असून दि. ०२ ऑक्टोबर २०१६ रोजी महापालिकेस मा. महापौर यांच्या प्रयत्नाने **गोल्डन बुक ऑफ वर्ड रेकार्ड** देखील मिळालेला आहे. सार्वजनिक स्वच्छता उपद्रव नियंत्रणासाठी मोकळ्या जागी/दुकानाबाहेर उघड्यावर मास विक्री केल्यास प्रत्येक वेळी किमान रु. ३,०००/- मात्र पर्यंत दंडाची आकारणी करणे. ह्या सर्व बाबींचा समावेश करणे. तसेच सदरील निविदा अभिकर्ता नेमणूक ई-निविदा प्रक्रिया करताना माजी सैनिकांच्या नोंदणीकृत संस्था (Ex.Service) / नोंदणीकृत सिक्युरीटी एजन्सी असणे आवश्यक असल्याची अट निविदेत टाकणे संयुक्तीक आहे. तसेच १) नागरिकांना प्रशासकीय दंडाची रक्कम माहिती व्हावी त्यादृष्टीने दंड वसुल करणाऱ्या व्यक्तीकडे दंडाच्या रक्कमेचा चार्ट ठेवणे व फलक लावुन मुख्य ठिकाणी प्रसिध्द करणे. २) ठेकेदाराने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांकडे ओळखपत्र व ड्रेस कोड नुसार ते ड्रेसवर असणे आवश्यक आहे. ३) वारंवार दंड करुन देखील त्या ठिकाणी तेच कृत्य वारंवार होत असेल तर ठेकेदारास जबाबदार धरणे. ४) प्रत्येक पाणपट्टीधारकाने स्वतंत्र कचरापेटी ठेवणे बंधनकारक करणे. ५) रस्त्यावर बेकायदेशीर पार्किंग करुन रहदारीला अडथळा होऊ नये त्या दृष्टीने दंडात्मक कारवाई करणे. ६) पात्र ई-निविदाकारांपैकी ज्यांचे ई-निविदा दर जास्त असतील त्या दराने निविदेमध्ये सहभागी सर्व पात्र ई-निविदाकारांचे पॅनल नेमुन पॅनलवर ठेकेदार नियुक्त करणे. सदर उपक्रम पुढेही चालु ठेवल्यास स्वच्छ भारत मिशनअंतर्गत परिणामकारक ठरु शकेल.

**अ) सार्वजनिक स्वच्छता उपद्रव नियंत्रणासाठी प्रशासकिय शुल्क**

| अ.क्र. | तपशील | कायदेशीर तरतूद | वसूल करावयाची प्रती प्रकरणासाठी दंडाची रक्कम ठरावाप्रमाणे नमूद करणे |
|---|---|---|---|
| १) | सार्वजनिक जागेत अस्वच्छता पसरविणे. | १) घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०१६ अन्वये २) महाराष्ट्र | रु.२००/- |
| २) | खाजगी मालमत्तेच्या जागी कचरा टाकणे | | रु.२००/- |
| ३) | वाहनांतून फेकला जाणारा कचरा | | रु.२००/- |
| ४) | वाहतुकीच्या वाहनांतून फेकला जाणारा कचरा | | रु.२००/- |
| ५) | सार्वजनिक ठिकाणी आंघोळ करणे | | रु.१००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६) | सार्वजनिक ठिकाणी थुंकणे | प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २२८ ते २३२ | रु.१००/- |
| ७) | सार्वजनिक ठिकाणी मलमूत्र विसर्जित करणे | | रु.२००/- |
| ८) | सार्वजनिक ठिकाणी प्राणी व पक्ष्यांना खाण्यास देणे. | | रु. ५००/- |
| ९) | सार्वजनिक ठिकाणी वाहने, अन्य कोणत्याही वस्तू दुरुस्त करणे. | | रु.५००/ |
| १०) | वर्गीकरण न केलेला व वेगवेगळा न साठविलेला घनकचरा प्रती व्यक्तीस | | रु.१००/- |
| ११) | अधिकांश कचरा उत्पादक म्हणजे मालक, दुकानदार, भोगवटादार, गृहनिर्माण संस्था किंवा संकुलाचा मालक किंवा भोगवटादाराच्या वतीने प्रतिनिधीत्व करणारी कोणतीही व्यक्ती, उपहारगृह, हॉटेल्स, बाजार, फेरीवाले, दवाखाने, औद्योगिक दवाखाने, औद्योगिक मालमत्ता आणि व्यापारी संकुले/मॉल्स, शैक्षणिक संस्था यामध्ये कोणतीही सरकारी किंवा सार्व. कार्यालये, इमारत किंवा अन्य वापरकर्ते जसे क्लब, जिमखाने, युवा कार्यालये, शैक्षणिक संकुले, इस्पितळे इत्यादी व्यवसायाचा कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकणे. | | रु.३,०००/- |
| १२) | जैविक कचरा वर्गीकरण न करुन देणे | १) घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०१६ अन्वये<br>२) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम | रु.१००/- |
| १३) | प्रक्रिया न केलेला जैव वैद्यकीय कचरा साठवणूक करणे. | | अ) दहा किलो जैव वैद्यकीय कचरासाठी रु. ५०/-<br>ब) दहा किलो ते ५०० किलोसाठी प्रती किलो रु. १०/- प्रमाणे प्रशासकीय शुल्क वसुल केले पाहीजे. |
| १४) | बांधकाम आणि निष्कासनातून निर्माण होणारा कचरा, दगड, माती, राडा-रोडा, वाळू, विटा सार्वजनिक ठिकाणी टाकणे. | | एक ब्रास दगड, माती, राडा रोडा, वाळू. रु.२५००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | २२८ ते २३२ | प्रमाणे विटा नग १ ते १००० नग. रु. २५००/- १००० नग ते अधिक रु. २५००/- प्रमाणे | |
| | १५) | सुका कचरा एक आठवडा पेक्षा अधिक दिवस साठवणूक करणे. | | रु. १००/- | |
| | १६) | खाजगी इमारतीमधील मोठी उद्याने आणि बागबागीचा मधील कचरा तसेच खाजगी मोकळ्या जागेत कचरा टाकणे, साठविणे. | | रु. ३००/- | |
| | १७) | रस्त्याच्या कडेला किंवा कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा घनकचरा जाळणे. | | रु. २००/- | |
| | १८) | कोंबड्या, मासळी, कत्तलीचा कचरा | | पहिल्या १० किलोसाठी रु. ५००/- व त्यापुढील प्रत्येक किलोसाठी रु. २०/- प्रमाणे आकारणी करणेत येईल. | |
| | १९) | सार्वजनिक स्वच्छता उपद्रव नियंत्रणासाठी मोकळ्या जागी/दुकानाबाहेर उघड्यावर मास विक्री केल्यास | | रु. ३,०००/- | |
| | २०) | सर्व विक्रेते/फेरीवाले, त्यांनी तयार केलेला जैविक कचरा व इतर कचरा | | रु. ५००/- | |
| | २१) | सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक रस्त्यावर मालकीच्या/पाळीव प्राण्यांपासून होणारा कचरा | | रु. २००/- | |
| | २२) | रस्त्यावर वाहने उभी केल्यास सदर वाहनाखालची जागा अथवा रस्त्याचा भाग साफ न करणे. | | रु. २००/- | |
| | २३) | महापालिकेची परवानगी न घेता भिंतीवर भित्तीपत्रके अथवा चित्रे लावणे. | महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम | एका पोस्टर बॅनरसाठी रु. २००/- प्रमाणे प्रशासकीय शुल्क | |
| | २४) | सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, गटारीवर अतिक्रमण करुन | | प्रशासकीय शुल्क | |

| | | | |
|---|---|---|---|
| | अस्वच्छता निर्माण करणे. | २२८ ते २३२ | रु. १,०००/- |
| २५) | प्रत्येक पानपट्टीधारकाने स्वतंत्र कचरा पेटी ठेऊन त्यामध्ये कचरा जमा करणे आवश्यक. | | रु. २००/- |
| २६) | सार्वजनिक रस्त्यावर वाहने उभी करुन रहदारीला अडथळा निर्माण केल्यास | | रु. २००/- |

ब) सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, तंबाखूमिश्रीत पान, सिगारेट, गुरखा व तंबाखूजन्य इतर पदार्थ इ. खाण्यास, विक्रीस अथवा साठवणूक करणेस प्रतिबंध करणेकामी दंड/शुल्क वसूल करणेसाठी अभिकर्ता (कंत्राटदार) ची नेमणूक करणे.

| अ. क्र. | तपशील | कायदेशीर तरतूद | वसूल करावयाची प्रती प्रकरणासाठी दंडाची रक्कम ठरावाप्रमाणे नमूद करणे |
|---|---|---|---|
| १) | सार्वजनिक ठिकाणी पान खाऊन थुंकणे | जाहिरात, प्रतिबंध व व्यापार, वाणिज्य उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनीयमन) कायदा २००२ चे कलम ३१ द्वारे | रु. २००/- |
| २) | सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणे | | रु. १००/- |
| ३) | सार्वजनिक ठिकाणी गुटखा खाणे | | रु. १००/- |
| ४) | धार्मिक/शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालये आणि सार्वजनिक ठिकाणापासून १०० मीटर परिसरात पान, तंबाखू, गुटखा व सिगारेट विक्री व साठवणूक करणे. | | रु. ५००/- |

महानगरपालिका हद्दीमध्ये सार्वजनिक उपद्रव नियंत्रण व तंबाखु, तंबाखुजन्य पदार्थाची विक्री, सेवन, साठवणूक प्रतिबंध कायदा अन्वये स्वच्छता उपद्रव नियंत्रण करणेसाठी प्रभाग समिती ए ते आय प्रभाग समिती निहाय स्वतंत्र सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या वित्तीय वर्षाकरिता वार्षिक ई-निविदा मागविणेकामी व तद्नुषंगिक येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**अनुमोदक :- (भरत मकवाना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

| | |
|---|---|
| **१३) वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ' डी ' मधील वॉर्ड क्र. ७९ मध्ये आचोळे तलावाचे सुशोभिकरण करणे कामाचे अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरील प्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- (रुपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| **१४) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण मोहिम राबविण्यासाठी डस्टबिन खरेदी करणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे एकुण ४३९२+१०३५ = ५४२७ हिरव्या व निळया डस्टबीन्स खरेदीसाठी प्रती डस्टबीन्स रु.३६००/-(कमी अधिक)याप्रमाणे रु.१,९५,३७,२००+ GST इतका खर्च अपेक्षीत आहे. कच-याचे १००% विलगीकरण माहे डिसें.२०१७ पर्यंत करण्याचे केंद्रशासनाचे आदेश असुन मनपाकडे पुरेसे हिरवे व निळे डस्टबीन नसल्याने अद्यापी कच-याचे विलगीकरण करणे शक्य झालेले नाही. त्यामुळे १००% कच-याचे विलगीकरण करण्यासाठी वरीलप्रमाणे डस्टबीन्स खरेदी करावे लागणार आहेत. सदरचा खर्च घनकचरा व्यवथापनांतर्गत अनुदानासह रस्ते, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे इ. साफसफाईसाठी घंटा गाडी, यांत्रीक झाडू उपलब्ध करणेसह सफाई ठेका व भाडयाच्या वाहनाव्दारे यांत्रिक पध्दतीने नाले सफाई या लेखाशिर्षकातील तरतुद रक्कम रु.१३८/- कोटी मधुन खरेदी करता येईल. त्यामुळे उपरोक्त प्रमाणे डस्टबीन खरेदी करणेसाठी जाहीर ई-निविदा प्रक्रिया करणेस व येण-या अंदाजित रु.१,९५,३७,२००/- अधिक GST सह अशा एकुण खर्चास व तद्नुषंगाने कार्यवाहीस ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (नितीन राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| **१५) वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत ७ व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१७ चे यशस्वी आयोजन करण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.** | प्रस्तावाचा ठराव/निर्णय :- वरील विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. प्रस्तावात नमुद असल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रती वर्षी राष्ट्रीय पातळीवरील महापौर मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. व सदर स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात मे.आर्यन्ज स्पोर्टस **पी आर ॲन्ड इव्हेंन्ट** हयाचा अत्यंत महत्वाचा वाटा असून त्यांच्या मार्फत या स्पर्धेच्या आयोजनाचा आर्थिक भार कमी करणेकामी प्रायोजक मिळविणेसाठी प्रत्येक स्पर्धेत सहाय्य असते. सबब आयोजनाचा आर्थिक भार कमी करणे व खर्चात बचत होण्याकरीता प्रायोजक मिळविणेकामी मागील वर्षी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३ दिनांक १९/०८/२०१६ अन्वये मे.आर्यन्ज स्पोर्टस **पी आर ॲन्ड इव्हेंन्ट** यांनी तीन वर्षासाठी म्हणजेच सन २०१६-१७,२०१७-१८,२०१८-१९ या वर्षासाठी नियुक्ती करण्यांस मंजुरी दिलेली आहे. सदर मंजुरीस अनुलक्षुन यावर्षी देखील म्हणजेच सन२०१७-१८ या वित्तीय वर्षात आयोजित केलेल्या महापौर मॅरेथॉन स्पर्धेसाठी जास्तीत जास्त प्रायोजक मिळविणेकामी याद्वारे मे. आर्यन्ज स्पोर्टस **पी आर ॲन्ड इव्हेंन्ट** नियुक्तीस ही सभा सर्वानुमते मुंजुरी देत आहे.<br>या स्पर्धेचे आयोजन यशस्वी करणेकामी वसई तालुका कला-क्रिडा विकास मंडळ (रजि) यांची मदत घेणे वसई तालुका कला-क्रिडा विकास मंडळाचे सरचिटणीस श्री.प्रकाश वनमाळी, वसई विरार शहर महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती |

सभापती श्री.संदेश जाधव यांची मॅरेथॉन स्पर्धेच्या मुख्य समन्वयक पदी नियुक्ती करणेंस आजची ही सभा मंजुरी देत आहे.

स्पर्धेचे उत्तम प्रकारे नियोजन करणेकामी प्रस्तावात नमुद त्या बाबींसाठी वार्षीक ठेकेदार यांचे मंजुर ठेक्यातून साहित्य, चिज, वस्तु उपलब्ध करुन घेणे/ कामे करुन घेणे तसेच उर्वरीत व अनुषंगीक व आवश्यक बाबीसाठी,दरपत्रक /रोखीने Spot खरेदी, निविदा व ई-निविदा प्रक्रीये द्वारे कार्यवाही करणेंस व महापौर मॅरेथॉन २०१७ चे यशस्वी आयोजन करणेकामी रुपये १ कोटी ५० लक्ष इतक्या खर्चास आजची ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते आर्थिक व प्रयासकीय मंजुरी देत आहे.

**अनुमोदक :- (पंकज ठाकूर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**१६) महानगरपालिका हद्दीत क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थाना प्रोत्साहनपर अनुदान देणेबाबतची नियमावली.**

प्रस्तावाचा ठराव/निर्णय - वरिल विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. याच भुमिकेतून राज्याचे क्रीडा धोरण, 2012 शासनाकडून घोषित करण्यांत आले असून, त्याची अंमलबजावणी करण्यास दिनांक 14/06/2012 च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यांत आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील दिनांक 1 जुलै 2011 रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा धोरणानुसार राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना व वाढ करण्यामध्ये, तसेच खेळाचा प्रचार व प्रसार करण्यामध्ये एकविध खेळ संघटना मोलाचा वाटा उचलतात, त्यांना अर्थसहाय्य देण्याची योजना आहे.

त्याच अनुषंगाने महानगरपालिका हद्दीतील किंवा पालघर जिल्ह्यातील परंतु महानगरपालिका हद्दीत कार्यरत असलेल्या तसेच क्रीडा संस्थेत,महानगरपालिका हद्दीतील खेळाडुंचा समावेश असलेल्या नोंदणीकृत क्रीडा संस्थांना अनुदान देणेसाठी हया प्रस्तावाच्या अनुषंगाने दाखल झालेल्या उपसुचनेनुसार खालील प्रमाणे सुधारीत अनुदान खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्था | बाब | शासनाचे नविन अनुदान दर | महानगरपालिकेचे प्रस्तावित अनुदान |
|---|---|---|---|---|
| 1 | राज्य संघटना | निर्वाह अनुदान | राज्य संघटनेशी सलग्न प्रत्येक जिल्हामागे रु.5000/- किंवा प्रत्येक | राज्य संघटनेशी सलग्न प्रत्येक जिल्हामागे रु. ५ लक्ष इतके वार्षिक अनुदान |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | खर्चाच्या 50% | | |
| | | | | क्रीडा साहित्य | रु.25,000/- | रु.25,000/- | |
| | | 2 | जिल्हा संघटना | निर्वाह अनुदान | रु.20,000/-<br>किंवा प्रत्यक्ष<br>खर्चाच्या50% | रु.५ लक्ष इतके<br>वार्षिक अनुदान | |
| | | | | क्रीडा साहित्य | रु.20,000/-<br>किंवा प्रत्यक्ष<br>खर्चाच्या50% | रु.20,000/- किंवा<br>प्रत्यक्ष<br>खर्चाच्या50% | |
| | | 3 | स्थानिक मंडळे,क्रीडा संस्था | निर्वाह अनुदान | रु.3000/-<br>किंवा प्रत्यक्ष<br>खर्चाच्या50% | रु.५ लक्ष इतके<br>वार्षिक अनुदान | |
| | | | | क्रीडा साहित्य | रु.3000/-<br>किंवा प्रत्यक्ष<br>खर्चाच्या50% | रु.3000/- किंवा<br>प्रत्यक्ष<br>खर्चाच्या 50% | |
| | | 4 | राज्य संघटना,क्रीडा मंडळे, | स्पर्धा अनुदान | अ) राज्यस्तरीय अजिंक्यपद - खुला गट स्पर्धा<br>रु.4.00 लाख व<br>इतर गटासाठी<br>रु.2.00 लाख<br>ब) राष्ट्रीय<br>अजिंक्यपद खुला गट स्पर्धा<br>रु.8.00 लाख<br>इतर गटासाठी | अ) जिल्हास्तरीय अजिंक्यपद - खुला गट स्पर्धा<br>रु.2.00 लाख व<br>इतर गटासाठी<br>रु.1.00 लाख<br>ब) राज्यस्तरीय<br>अजिंक्यपद - खुला गट स्पर्धा<br>रु.4.00 लाख व<br>इतर गटासाठी | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | तसेच शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा रु.5.00 लाख क) अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा रु.20.00 लाख | रु.2.00 लाख क) राष्ट्रीय अजिंक्यपद खुला गट स्पर्धा रु.8.00 लाख इतर गटासाठी तसेच शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा रु.5.00 लाख ड) अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा रु.20.00 लाख |

उपरोक्तनुसार वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील किंवा पालघर जिल्ह्यातील परंतु प्रत्यक्ष महानगरपालिका हद्दीत कार्यरत असलेल्या तसेच क्रीडा संस्थेत महानगरपालिका हद्दीतील खेळाडुचा समावेश असलेल्या नोंदणीकृत क्रिडा संघटना, यांना प्रस्तावाच्या अनुषंगाने दाखल असलेल्या उपसुचने प्रमाणे, अनुदान व प्रस्तावातील नमुद निकषाप्रमाणे निर्वाह अनुदान व क्रिडा साहीत्यासाठी वार्षिक अनुदान देणेसाठी येणा-या खर्चास आजची हि सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

**अनुमोदक :- (पंकज ठाकूर)** **सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**नगरसचिव**

**वसई विरार शहर महानगरपालिका**